शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ,पालघर

जिल्हा गुणवत्ता कक्ष, १६ ,तळ मजला ,जिल्हा परिषद पालघर,
नवघर ,कोळगाव,बोईसर रोड ता.जि.पालघर ४०१ ४०४

email-dietpalghar@gmail.com फोन नं.०२५२५-२५४४५६

जा.क्र.जि.शि.प्र.सं.पा./२०२५-२६/ ३०४ दिनांक:-२८/१०/२०२५

प्रति,
१.मा.प्राचार्य,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ( सर्व )
२.शिक्षणाधिकारी ,प्राथमिक ,जि.प.( सर्व )
३. शिक्षणाधिकारी ,माध्यमिक ,जि.प.( सर्व )
४.गटशिक्षणाधिकारी ,पंचायत समिती ( सर्व )
५.प्रशासनाधिकारी ,मनपा/नपा ( सर्व )

विषय :- शिक्षक व अधिकारी /कर्मचारी यांच्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन बाबत...

संदर्भ :- १.मा.संचालक,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,पुणे यांचे जाक्र.साव्यावि/राशैसंप्रपम/शिक्षक स्पर्धा /२०२५-२६/दिनांक.३०.०९.२०२५ रोजीचे पत्र.
२. मा.संचालक,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,पुणे यांचे दिनांक.१४/१०/२०२५ रोजीच्या ऑनलाईन बैठकीतील सूचना.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, DIET मधील अधिकारी, कर्मचारी तसेच शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृद्धिंगत करणे, त्यांच्यात समन्वय, सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे तसेच त्यांच्या डिजिटल, भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्याच्या उद्देशाने तालुका, विभाग व राज्य स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून करण्यात येत आहे.

राज्यातील सर्व शिक्षक व अधिकारी हे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सतत प्रयत्न करत असतात, गुणवत्तेचा ध्यास घेतलेले शिक्षक व अधिकारी हे अनेक पुस्तकांचे व नवनवीन योजनांचे वाचन करत असतात. वाचनातून व लेखनातून ते प्रगल्भ बनतात. हेच प्रगल्भ विचार इतरांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी देलेल्या निर्देशानुसार शिक्षक व अधिकाऱ्यांसाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पालघर आत्मचरित्र लेखन (Autobiography) आयोजन करीत आहे.

सहभागी स्पर्धक :- शासकीय,स्थानिक स्वराज्य संस्था,अनुदानित ,अंशत: अनुदानित प्राथमिक,माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक ,शिक्षक व कर्मचारी तसेच शिक्षण विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी सदर स्पर्धा खुली आहे.

**सहभागी स्पर्धक :-** शासकीय,स्थानिक स्वराज्य संस्था,अनुदानित ,अंशत: अनुदानित प्राथमिक,माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक ,शिक्षक व कर्मचारी तसेच शिक्षण विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी सदर स्पर्धा खुली आहे.

विषय:-

१.माझे जीवन एक आत्मचरित्र ( आत्मकथन )

स्पर्धेचे नियम :-

१) स्पर्धा वरील नमूद प्राथमिक, माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच शिक्षण विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी खुली आहे.

२) निवडलेल्या विषयावर ४००० शब्दमर्यादेपर्यंत लेखन असावे,

३) लेखन स्वतःचे असावे. या अगोदर कुठेही ते प्रकाशित झालेले नसावे.

४) लेखनातून कोणत्याही धर्म, व्यक्ती अथवा महान व्यक्ती अथवा समुदाय यांची प्रतिमा मलीन होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

५) निवडलेल्या विषयावर लेखन करताना ते सुस्पष्ट, टापटीप व सुलभ पद्धतीने वाचता येईल यावावत काळजी घेण्यात यावी.

६) लेखन हे मराठी, हिंदी, इंग्रजी या पैकी कोणत्याही एका भाषेत असावे.

७) लेखन हे A४ कागदावर लेखन करायचे आहे.

८) कागदावर लेखन करताना ते स्वतःच्या हस्ताक्षरात असावे.

९) कागदाच्या दोन्ही बाजूला डाव्या व उजव्या बाजूला १.५ इंच जागा सोडलेली असावी.

१०) लेखनाच्या अगोदर योग्य ते शीर्षक नमूद असावे.

११) सर्वात शेवटी लेखन झाल्यानंतर खाली आपले पूर्ण नाव, पद, शाळेचे नाव, पत्ता, मोबाइल नंबर व ई-मेल आयडी व स्वतःचा पासपोर्ट साईजचा फोटो जोडावा.

१२) स्पर्धेत भाग घेण्यासाठी शासनाकडून यशावकाश वेळापत्रक कळवण्यात येईल.

१३) सदर स्पर्धा ही तालुका, विभाग व राज्य स्तरांवर होईल.

१४) स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही.

१५) कोणत्याही कॉपीराइटचे उल्लंघन अपात्रतेस कारणीभूत ठरेल आणि बक्षीस रक्कम जप्त होईल. यावावत निवड समिती आणि मूल्यमापन समितीचा निर्णय अंतिम असेल.

१६) निवड समिती आणि मूल्यमापन समितीचे निर्णय अंतिम आणि सर्व अर्जदारांसाठी बंधनकारक असतील. मूल्यमापन समिती अर्जदाराकडून प्रवेशाच्या कोणत्याही पैलूवर स्पष्टीकरण मागू शकते आणि दिलेल्या वेळेत ते सादर न केल्यास, प्रवेश अपात्र ठरवला जाऊ शकतो.

१७) अयोग्य किंवा आक्षेपार्ह सामग्री समाविष्ट असलेले लेखन, ज्यामध्ये मानवी हक्क किंवा पर्यावरण उल्लंघन, कायदा, धार्मिक, भारताची सांस्कृतिक आणि नैतिक परंपरा आणि प्रथा यांच्या विरुद्धातील इतर कोणत्याही सामग्री यांचा समावेश आहे असे लेखन प्रतिबंधित आहे. आणि ते ताबडतोब अपात्र ठरवले जाईल. मूल्यमापन समिती वरील निकषांव्यतिरिक्त अयोग्य आणि आक्षेपार्ह ठरवेल अशा इतर प्रवेशिकांना स्पर्धेत वाद करण्याचा अधिकार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांना आहे.

१८) प्रत्येक सहभागी स्पर्धकाला स्वयंघोषणा प्रमाणपत्र भरून देणे अनिवार्य आहे.

१९) पर्यवेक्षकीय अधिकारी व कर्मचारी यात आपला सहभाग निश्चित करू शकतात.

२०) भाग घेणारे सहभागी स्पर्धक यांनी स्पर्धा मध्ये भाग घेताना सोबत दिलेले स्वयंघोषणा प्रमाणपत्र नमुना व प्रवेश अर्ज नमुना स्पर्धेच्या ठिकाणी जमा करावा.

स्पर्धेत सहभागी होण्याची प्रक्रिया:-

१. स्पर्धेच्या नाव नोंदणीसाठी मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद पुणे यांनी दिलेल्या लिंकवर केंद्रप्रमुख यांनी प्रत्येक स्पर्धेसाठी केंद्रातून एका शिक्षकाचे नाव स्पर्धेसाठी नोंदवावे.

२. प्रत्येक स्पर्धेत केंद्रातील किमान एका शिक्षकाने सहभाग घेणेबाबत प्रोत्साहित करण्यात यावे.

३. स्पर्धानिहाय सहभागी होणाऱ्या कर्मचा-यांची/ शिक्षकांची लेखी संमती घ्यावी व स्पर्धेवेळी आयोजकांकडे सादर करावी.

४. सर्व स्पर्धासाठी तालुकास्तरावर सहभाग घेणाऱ्या शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांचे नामनिर्देशन फॉर्मद्वारे संकलित केले जाईल, केवळ केंद्रप्रमुख यांना लिंक पाठविली जाईल व केंद्रप्रमुख यांनी स्वतः शिक्षकांची क्षमता, कौशल्य पाहून नामनिर्देशन करावे. दि. ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत केंद्रप्रमुख यांनी शिक्षकांची माहिती भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

५. सर्व स्पर्धा पुढील तीन स्तरावर आयोजित करण्यात येतील.

a. तालुका स्तर २. विभाग स्तर ३. राज्यस्तर

६ . वैयक्तिक तालुकास्तरावरील प्रत्येक स्पर्धेचा विजेता विभाग स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र राहील. विभाग स्तरावर प्रथम ५ क्रमांकाचे विजेते राज्य स्तरावर सहभागासाठी पात्र राहतील.

७. या स्पर्धाची तयारी करण्यासाठी कोणत्याही प्रकारची सुट्टी घेता येणार नाही तसेच शिक्षकांच्या सहभागामुळे अध्ययन अध्यापनाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

८. तालुकास्तरावर वरील स्पर्धांची जबाबदारी ही गटशिक्षणाधिकारी यांची राहील गटशिक्षणाधिकारी यांनी तालुका क्रीडा अधिकारी व तालुकास्तरीय समितीच्या मदतीने तालुकास्तरीय स्पर्धा विहित वेळेत पार पाडाव्यात.

९. तालुकास्तरीय स्पर्धेसाठी सक्षम परीक्षकांची नावे अंतिम करून DIET कडे बायोडाटासह दि. ०५/११/२०२५ पर्यंत या कार्यालयाला मेलवर पाठवावी. तसेच स्पर्धेचे ठिकाण ही कळवावे.

१०. प्रत्येक स्पर्धेसाठी तीन परीक्षकांची निवड करण्यात यावी परीक्षकांसाठी एससीईआरटी, पुणे कडून निधी प्राप्त झाल्यास स्पर्धेच्या दिवसासाठी निर्धारित मानधन देण्यात येईल.

११. प्रत्येक स्पर्धेचे ठिकाण हे आवश्यक सुविधा उपलब्ध असलेले असावे.

परीक्षण निकष :-

१) स्पर्धेच्या परीक्षणासाठी लेखन क्षेत्रातील तज्ज्ञ, जाणकार व अनुभवी व्यक्तींची निवड करावी.

२) स्पर्धा परीक्षणासाठी ३ सदस्यांची समिती असावी.

३) स्पर्धा परीक्षण पुढील मुद्द्यांच्याआधारे करावे, समितीतील तिन्ही सदस्यांनी दिलेल्या गुणांच्या सरासरीनुसार अंतिम निकाल घोषित करावा.

मुल्यांकन निकष :-

| अ.क्र | निकष | गुण |
|---|---|---|
| १. | विषयाची मांडणी | २० |
| २. | भाषेचा वापर व ओघवतेपणा | २० |
| ३. | सर्जनशीलता व अभिव्यक्ती | २० |
| ४. | लेखन कौशल्य व व्याकरणाची जाण | २० |
| ५. | सुसंगता आणि रचना | २० |
| | | १०० |

विविध स्तरावरील समित्या:-

१.तालुका निर्णायक समिती:-

| अ.क्र | निर्णायक समिती | समितीतील पद |
|---|---|---|
| १. | गटशिक्षणाधिकारी | अध्यक्ष |
| २. | डायट संपर्क अधिकारी | सदस्य |
| ३. | केंद्रप्रमुख | सदस्य |
| ४. | विषय साधनव्यक्ती | सदस्य |
| ५. | मुख्याध्यापक | सदस्य |
| ६. | अनुभवी तज्ञ शिक्षक | सदस्य |
| ७. | शिक्षण विस्तार अधिकारी | सदस्य सचिव |

२. जिल्हास्तरीय समिती:-

| अ.क्र | निर्णायक समिती | समितीतील पद |
|---|---|---|
| १. | प्राचार्य,डायट | अध्यक्ष |
| २. | शिक्षणाधिकारी ( प्राथ.) | सदस्य |
| ३. | शिक्षणाधिकारी ( माध्य.) | सदस्य |
| ४. | वरिष्ठ अधिव्याख्याता/ अधिव्याख्याता | सदस्य |
| ५. | गटशिक्षणाधिकारी-१ | सदस्य |
| ६. | मुख्याध्यापक-१ | सदस्य |
| ७. | विषय साधनव्यक्ती-१ | सदस्य |
| ८. | केंद्रप्रमुख-१ | सदस्य |
| ९. | अनुभवी भाषा तज्ञ शिक्षक -१ | सदस्य |
| १०. | वरिष्ठ अधिव्याख्याता/ अधिव्याख्याता | सदस्य सचिव |

स्पर्धेचे संभाव्य नियोजन :-

| अ.क्र | वार व दिनांक | स्पर्धेचे नाव | आयोजक जिल्हा | नोव्हेंबर | डिसेंबर | जानेवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | तालुकास्तर | विभागस्तर | राज्यस्तर |
| १. | दुसरा शुक्रवार व, दुसरा शनिवार | आत्मचरित्र लेखन (Autobiography) | पालघर | नोव्हेंबर अखेर पर्यंत कॉलम २ मधील दिवसापर्यंत पूर्ण करावयाचे कामकाज (स्पर्धेतील १ विजेता निवडणे) | डिसेंबर अखेर पर्यंत कॉलम २ मधील दिवसापर्यंत पूर्ण करावयाचे कामकाज (स्पर्धेतील ५ विजेता निवडणे) | जानेवारी अखेर पर्यंत कॉलम २ मधील दिवसापर्यंत पूर्ण करावयाचे कामकाज (स्पर्धेतील १० विजेता निवडणे) |

२) विभाग व राज्यस्तर स्पर्धा :-
विभागस्तरीय स्पर्धा आयोजनासाठी नियोजन जिल्हास्तरीय समिती पालघर जिल्हा करेल. वरील नियोजनामध्ये काही कारणास्तव वदल झाल्यास SCERT / स्थानिक जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) यांचे मार्फत कळविण्यात येईल.

स्पर्धेचे ठिकाण:-

१. तालुकास्तरीय स्पर्धा संवधित गटशिक्षणाधिकारी यांचे मार्फत कळविण्यात येईल.

२. विभागस्तरीय स्पर्धा संवधित विभागस्तरीय DIET यांचे मार्फत कळविण्यात येईल.

३. राज्यस्तरीय स्पर्धा- जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,पालघर

सोबत प्रत:-

१.शिक्षक ,अधिकारी /कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका.

२.स्वयंघोषणा प्रमाणपत्र नमुना व प्रवेश अर्ज नमुना.

( संभाजी भोजने )
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
(DIET),पालघर

प्रत माहितीसाठी सविनय सादर :-

१.मा.संचालक,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,पुणे

२.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.पालघर

३.मा.आयुक्त ,महानगरपालिका ( सर्व )

४.मा.विभागीय शिक्षण उपसंचालक ( सर्व )

स्वयंघोषणा प्रमाणपत्र नमुना :

सहभागी स्पर्धक स्वयंघोषणा प्रमाणपत्र

मी श्री./श्रीम .................................................................................................... यादवारे जाहीर करत आहे की, या स्पर्धेसाठी मी स्वतः केलेले लेखन सादर करत आहे आणि लेखनातील विषय माझाच आहे. अर्जात मी दिलेली माहिती खरी आहे. स्पर्धा जिंकल्यास, जर माझ्याकडून पुरविण्यात आलेली कोणतीही माहिती खोटी ठरली किंवा लेखनास कॉपीराइटचे उल्लंघन झालेले आढळले तर मला स्पर्धेतून अपात्र ठरवले जाऊ शकते आणि मूल्यमापन समितीने घेतलेल्या निर्णयांवर कोणताही अधिकार नाही किंवा त्याबाबत मला काहीही म्हणता येणार नाही याची मला जाणीव आहे. भविष्यात राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांना या लेखनाचा वापर करण्यास मी संमती देत आहे.

स्वाक्षरी

नाव : ..............................................

शाळेचे नाव व पत्ता : ..............................

..........................................................

## प्रवेश अर्ज नमुना

**सहभागी स्पर्धक प्रवेश अर्ज :**

१) स्पर्धकाचे नाव व फोटो : ..........................................................

२) कार्यालयाचे/शाळेचे नाव व पत्ता : ..........................................................

३) केंद्राचे नाव (लागू असल्यास) : ..........................................................

४) तालुक्याचे नाव : ..........................................................

५) जिल्ह्याचे नाव : ..........................................................

६) संपर्क क्रमांक : ..........................................................

७) ई-मेल : ..........................................................

८) स्पर्धेसाठी निवडलेला विषय : ..........................................................

९) स्वयंघोषणा प्रमाणपत्र : ..........................................................